MHWR010016182025

## <u>मोटार अपघात प्रकरण क्रमांक ३३/२०२५</u>

**(कवडु नथ्थुजी मेश्राम व तीन -वि.- धनराज भिमराव धाबर्डे)**

**<u>निशाणी १० व ११ खालील संयुक्त आदेश</u>**

**(दिनांक २७.०८.२०२६)**

प्रस्तुतचा अर्ज गैरअर्जदार यांनी लेखी बयान अभिलेखावर दाखल करण्याची परवानगी मिळण्याकरीता आणि त्यांच्याविरुध्द दिनांक १९.११.२०२५ रोजी, पारीत करण्यात आलेला प्रकरण एकतर्फो चालविण्याबाबतचा आदेश रद्दबातल करुन मिळण्याकरीता दाखल केला आहे.

२. प्रस्तुतच्या अर्जांचे व अर्जदार यांनी दिलेल्या म्हणण्याचे अवलोकन केले. उभयपक्षांच्या विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला.

३. सदरहू गैरअर्जदाराच्या कथनानुसार, प्रस्तुतच्या प्रकरणात त्यांना कागदपत्र मिळालेले नसल्यामुळे ते विहीत मुदतीमध्ये लेखी बयान दाखल करु शकले नाही. गैरअर्जदार त्यांचे बचावार्थ लेखी बयान दाखल करू ईच्छीत आहे. सबब, त्यांच्याविरुध्द दिनांक १९.११.२०२५ रोजी, पारीत करण्यात आलेला प्रकरण एकतर्फो चालविण्याबाबतचा आदेश रद्दबातल करण्यात यावा आणि लेखी बयान अभिलेखावर दाखल करण्याची परवानगी देण्यात यावी, अशी त्यांनी विनंती केली आहे.

४. प्रस्तुत अर्जाकामी, अर्जदार यांनी प्रस्तुतच्या अर्जावरच म्हणणे दाखल करून आक्षेप नोंदविलेला आहे. गैरअर्जदार यांना समन्सची बजावणी होवून देखील, त्यांनी विहीत मुदतीमध्ये लेखी बयान दाखल केलेले नाही. गैरअर्जदाराने त्यांच्या

अर्जामध्ये नमूद केलेले कारण संयुक्तिक नसुन प्रस्तुतचे अर्ज खारिज करण्यात यावेत, अशी विनंती केलेली आहे.

५. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, गैरअर्जदार यांना दिनांक ११.१०.२०२५ रोजी, नोटीसीची बजावणी झाली परंतु ते न्यायालयात उपस्थित झाले नाही. गैरअर्जदार विहीत मुदतीमध्ये न्यायालयात उपस्थित झाले नाही. त्यामुळे, दिनांक १९.११.२०२५ रोजी, गैरअर्जदाराविरुध्द प्रकरण एकतर्फो चालविण्याबाबतचा आदेश पारीत करण्यात आल्याचे दिसून येते. गैरअर्जदार यांनी लेखी बयान अभिलेखावर दाखल करण्याची परवानगी मिळण्याकरीता दाखल केलेल्या अर्जासोबतच लेखी बयान देखील दाखल केलेले आहे. गैरअर्जदार न्यायालयापुढे हजर न राहण्याचे संयुक्तिक कारण दिसुन येत नाही. गैरअर्जदार यांनी अर्जात नमूद केलेले कारण जरी संयुक्तिक नसले तरी त्यांना त्यांची बाजू मांडण्याकामी समाधानकारक बचावाची संधी देणे आवश्यक आहे, जेणेकरून एकाचवेळी गुणदोषावर वाद निर्णित होवू शकतो. त्यामुळे सदरचे अर्ज मंजूर करणे न्याय्य आहे. तथापि, अर्जदारांना झालेली गैरसोय व असुविधा याकडेही दुर्लक्ष करता येणार नाही आणि त्याकरीता गैरअर्जदार यांनी अर्जदार यांना प्रत्येकी रुपये ५००/- याप्रमाणे खर्च रक्कम एकूण रूपये २,०००/- देणे न्याय्य व संयुक्तिक ठरेल. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## <u>आ दे श</u>

१. प्रस्तुतचे अर्ज (निशाणी क्रमांक १० व ११) मंजूर करण्यात येत आहे.

२. गैरअर्जदार यांच्याविरुध्द दिनांक १९.११.२०२५ रोजीचा एकतर्फा प्रकरण चालविण्याबाबतचा आदेश त्यांनी अर्जदार क्रमांक १ ते ४ यांना प्रत्येकी रुपये ५००/- याप्रमाणे एकूण रुपये

२,०००/– खर्च देण्याच्या अटीवर रद्दबातल करण्यात येत आहे आणि गैरअर्जदारास लेखी बयान अभिलेखावर दाखल करण्याची परवानगी देण्यात येत आहे.

३. गैरअर्जदाराने अर्जदारांना सदरची खर्चाची रक्कम रूपये २,०००/– पुढील तारखेच्या आत द्यावयाची आहे.

४. खर्चाची रक्कम रुपये २,०००/– न्यायालयात जमा केल्यानंतर, गैरअर्जदार यांचे लेखी बयान अभिलेखावर घेण्यात यावे.

HEMANT BHAGWANTRAO GAIKWAD

Digitally signed by HEMANT BHAGWANTRAO GAIKWAD
Date: 2026.08.27 18:37:48 +0530

(हेमंत भ. गायकवाड)

अध्यक्ष,

मोटार अपघात प्राधिकरण,

दिनांकः– २७.०८.२०२६. वर्धा.

## C E R T I F I C A T E

The contents of this P.D.F. file Order are same word to word, as per the assigned Order.

(P.N.Shete)
Stenographer Gr-III